**"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "चला जाणुया नदीला" या अभियानासाठी गठीत समिती व उपक्रमास मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२/ प्र. क्र. २७६/सां.का.४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १६ जानेवारी, २०२४.**

**वाचा :-** १. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.२७६/सां.का.४, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२
२. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.२७६/सां.का.४, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२
३. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.२७६/सां.का.४, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२
४. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.२७६/सां.का.४, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२
५. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.२७६/सां.का.४, दिनांक २० जानेवारी, २०२३
६. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.२७६/सां.का.४, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३

**प्रस्तावना :-**

भारतीय संस्कृतीनुसार सजीवसृष्टीकरीता पंचमहाभुतांचे अस्तित्व अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळेच आपल्या संस्कृतीत या पंचमहाभुतांची पुजा करुन त्यांचे आपल्या जीवनातील स्थान अधोरेखित करण्यात आले आहे. "जल" हे या पंचमहाभुतापैकीच एक तत्व आहे. सजीवांच्या अस्तित्वासाठी पुरेशा स्वच्छ पाण्याची उपलब्धता न झाल्यास त्याचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. गेल्या काही काळात नैसर्गिक बदलामुळे पावसाचे प्रमाण व वेळा अनिश्चित झाल्याने पाण्याचे नियोजन करणे अडचणीचे झाले आहे. राज्यात गेल्या काही वर्षात निर्माण होणाऱ्या सततच्या अवर्षण परिस्थितीमुळे पाणी टंचाईचे संकट वाढत आहे. पाण्याची उपलब्धता व पाणी वापराचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचा गरजेपुरता वापर करणे, नैसर्गिक जलस्रोत, नदया व जलाशयाचे प्रदुषण रोखणे, पायाभूत सुविधाचे संरक्षण करणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांचे पालन करणे याबाबत समाजात जागृती व साक्षरता निर्माण होण्याची गरज लक्षात घेता, विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. तसेच नद्या व जलाशयाच्या माध्यमातून होणाऱ्या जल व हरित उत्पन्नाबाबत निदर्शनास आलेल्या या सर्व बाबी लक्षात घेऊन, तसेच नदीबाबत जनसामान्यांशी संवाद, समन्वय, नदीबाबतची माहिती जाणून घेण्यासाठी "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "चला जाणुया

नदीला” या अभियान सुरु करण्यात आले होते. आता, सदर अभियानांतर्गत गठीत समिती व उपक्रमास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत “चला जाणुया नदीला” या अभियानांतर्गत नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी उपर्निर्दिष्ट क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये दि. ३१ मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता या उपक्रम/अभियानास दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच उपर्निर्दिष्ट क्र. १ ते ५ येथील शासन निर्णय यांना सदर मुदतवाढ व नमूद अटी व शर्ती त्याच लागू राहतील.

०२: या प्रयोजनार्थ होणारा खर्च ज्या ठिकाणी अध्यक्ष जिल्हाधिकारी व आयुक्त महानगरपालिका हे असतील ते त्यांच्याकडील उपलब्ध निधीतून करतील. सांस्कृतिक कार्य विभागाकडून या प्रयोजनार्थ कोणताही निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२४०११६१८५४२६४७२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( बाळासाहेब ई. सावंत )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,मलबार हिल, राजभवन, मुंबई.
२. मा. अध्यक्ष/मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. सभापती/मा. उप सभापती, यांचे खाजगी सचिव विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा / विधान परिषद यांचे खाजगी सचिव
९. सर्व मा. सदस्य, विधानसभा / विधान परिषद
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व संबंधित शासकीय सदस्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२. सर्व मान्यवर अशासकीय समिती सदस्य (सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत)

१३. प्रधान सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

१४. उप सचिव ( सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

१५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, एम.जी. रोड, मुंबई ३२.

१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.

१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१८. कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

२०. महालेखापाल (लेखा परीक्षा) - १ महाराष्ट्र, मुंबई.

२१. महालेखापाल (लेखा परीक्षा) - २ महाराष्ट्र, नागपूर.

२२. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) - १ महाराष्ट्र, मुंबई.

२३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २ महाराष्ट्र, नागपूर.

२४. निवड नस्ती, सां.का.४.